**प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्रशासकीय मान्यता दिलेल्या महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या कामांना निधी वितरीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक टिडीएस २०२४/०८/प्र.क्र.१७२/पर्यटन-१**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक : २० डिसेंबर, २०२४.**

**संदर्भ :-** पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. टिडीएस २०२४/०८/ प्र.क्र.१७२/पर्यटन-१, दि.२४.०९.२०२४.

**शासन निर्णय :** पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत सन २०२४-२५ मध्ये संदर्भाधिन शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या खालील तक्तयातील कामांना स्तंभ क्र.४ येथे नमूद केल्याप्रमाणे **रु.५००.०० लक्ष** इतका निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. :-

**(रुपये लक्षात)**

| अ.क्र | कामांचे नाव | प्रशासकीय मान्यता | वितरीत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | Developing ICH based Experiential Tourism in Palghar and Nasik districts of Maharashtra | ५००.०० | ५००.०० |

०२. वरील कामांसाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नियुक्त करण्यात येत आहे. त्यानुसार खालील अटी व शर्तीचे अनुपालन व्हावे.

**०३. अटी व शर्ती :-**

१) उपरोक्त कामे दर्जेदार स्वरुपाची व्हावीत, याकरीता स्थापत्य विशारदांची (Theme Based Architect) नेमणूक करुन प्रत्यक्ष कामे नामांकित कंत्राटदारांच्या माध्यमातून करण्यात यावीत व त्या कामांचे योग्य संनियंत्रण आणि गुणनियंत्रण करण्यात यावे.

२) वितरीत केलेल्या निधीतून खर्च करताना वित्तीय नियमांचे आणि विविध नियमांतर्गत नेमून दिलेल्या कार्यपध्दतीचे पालन करण्यात यावे.

३) प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामांच्या निविदा प्रक्रिया तात्काळ राबवून कामांचे कार्यारंभ आदेश देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच सदर कामे तीन वर्षाच्या कालावधीत पुर्ण करणे बंधनकारक राहील.

४) सदर मंजूर कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात येऊन प्रत्यक्षात काम सुरु झाल्यावर सदर कामात / कार्यान्वयीन यंत्रणेत कोणत्याही परिस्थितीत बदल करता येणार नाही.

५) कोणत्याही परिस्थितीत मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांची राहील व जादा खर्च प्रित्यर्थ जादा अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

६) मंजूर तरतुदीतून करावयाचा खर्च वित्त विभागाच्या प्रचलित आदेशांनुसार करण्यात यावा व मंजूर कामे तात्काळ पूर्ण करावीत.

७) पर्यटन विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून केलेल्या कामाच्या ठिकाणी सदर कामे पर्यटन विभागाने प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या निधीमधून केली असल्याबाबतचे फलक लावण्यात यावेत.

८) ज्या संदर्भात निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे त्या प्रत्येक योजनेच्या संदर्भात वित्तीय अधिकाराच्या प्रत्यावर्तनानुसार सक्षम प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

९) तांत्रिक मान्यता विहित स्तरावर घेण्यात यावी.

१०) सदर कामांच्या निविदा ह्या व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांच्या मान्यतेने करण्यात याव्या.

११) पर्यटक सुविधा जसे निवास व्यवस्था, बैठक व्यवस्था यासारख्या सुविधा पर्यटन विभागास आवश्यक वाटल्यास सदरच्या विभाग / संस्थेमार्फत मोफत पुरविण्यात याव्यात.

१२) पर्यटक सुविधेचा व्यावसाईक वापराचा दर निश्चित करताना पर्यटन संचालनालयाची मान्यता घेण्यात यावी.

१३) रस्त्यांच्या प्रस्तावित कामांच्या प्रकरणांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील.

१४) योजनेत्तर स्वरुपाच्या कामासाठी (देखभाल/दुरुस्ती इ.) सदरची तरतूद उपयोगात आणली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१५) सदर कामांपैकी जी कामे तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी प्रस्तावित करुन देवस्थान/संस्थेच्या जागेवर करण्यात येणार आहेत अशा कामांसंदर्भात सदर देवस्थान/संस्थेकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील. तसेच अशा कामाच्या पूर्णत्वानंतर त्या संदर्भातील देखभाल/दुरुस्ती, संबंधित संस्थेने करण्यासंदर्भात संचालक, पर्यटन संचालनालय व संबंधित जिल्हाधिका-यांनी संबंधित देवस्थान / संस्थेबरोबर करारनामा करणे बंधनकारक राहील. अशा

प्रकारच्या देखभाल दुरुस्तीकरीता शासनाकडून यापुढे कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी व तशी अट करारात अंतर्भूत करण्यात यावी. तसेच या कामामुळे निर्माण होणाऱ्या सर्व सुविधा तसेच पर्यटन स्थळ सर्व नागरीकांसाठी खुले राहील, अशी अट करारात समाविष्ट करण्यात यावी.

१६) सदर निधीतून करावयाच्या कामांची भौतिक प्रगती तसेच निधीतून होणा-या खर्चाची मासिक विवरणपत्रे दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत पर्यटन संचालनालयास न चुकता सादर करावीत. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचा दाखला आणि निधीबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र न चुकता पर्यटन संचालनालयामार्फत शासनास सादर करण्यात यावे.

१७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांनी काम कोणत्याही अन्य योजनेतून / निधीतून पुर्ण करण्यात आले नाही याची खात्री करुनच निधीचे वितरण करावे. मंजूर असलेले काम कोणत्याही अन्य योजनेतून / निधीतून पुर्ण करण्यात आले असल्यास संबंधित कामास वितरित केलेला निधी शासनास परत करण्यात यावा व झालेल्या अनियमिततेबद्दल संबंधितांवर उचित कारवाई करण्यात वी.

१८) उर्वरित निधीची मागणी करताना उपयोगिता प्रमाणपत्र व कामाची गुणनियंत्रण यंत्रणेद्वारे प्रत्यक्ष तपासणी करुन कामाच्या गुणवत्तेबाबत व कामाच्या सद्यस्थितीबाबतचा प्रमाणित अहवाल (छायचित्रांसह) शासनास सादर करण्यात यावा.

१९) सदर काम पूर्ण झाल्यानंतर सदर कामाच्या देखभालाची तसेच इतर अनुषंगिक कामांची जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणा व संबंधित संस्था यांची राहील.

२०) काम पूर्ण झाल्यानंतर सदर पर्यटक सुविधा तात्काळ उपयोगात आणण्याच्या दृष्टीने काम सुरु असतानाच पूर्व नियोजन करावे.

४. उपरोक्त तक्त्यातील कामांवर होणारा खर्च **मुख्यलेखाशीर्ष "मागणी क्रमांक झेडडी-४, ३४५२-पर्यटन, पर्यटनासाठी पायाभूत सुविधा, १०१ पर्यटन केंद्रे (०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (१८) पर्यटन विकासासाठी विविध ठिकाणांसाठी मूलभूत सुविधांकरीता अनुदाने (३४५२ १९५८) ३१ सहायक अनुदाने" या लेखाशिर्षाखालील सन २०२४-२५ या वित्तीय वर्षासाठी मंजुर तरतुदीमधून भागविण्यात यावा.**

५. या प्रकरणी मंजूर करण्यात आलेल्या (प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत) सहायक अनुदानाची रक्कम आहरण करुन संबंधितांना वितरीत करण्याकरीता पर्यटन संचालनालयाशी संबंधित कामांसाठी मुख्य लेखा अधिकारी, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना 'आहरण व संवितरण अधिकारी' व सह संचालक पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित

करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम त्यांनी अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई येथे देयके सादर करुन संबंधितांना वितरीत करावी. सदर कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल पर्यटन संचालनालयामार्फत शासनास एक महिन्यात सादर करण्यात यावा.

६. सदर खर्च वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/ विनिमय, दि.१७.०४.२०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला, उपविभाग-३ अ.क्र.४ परिच्छेद क्र.२७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार मंजुर करण्यात येत आहे.

७. प्रमाणित करण्यात येते की, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३, दि.२५.०७.२०२४ अन्वये देण्यात आलेल्या सूचनेनुसार व अधिकाराच्या मर्यादेत सदर शासन परिपत्रकासोबतच्या परिशिष्टामधील तपासणीसूची बाबींची व अटींची पूर्तता करण्यात आली आहे. त्यानुसार सदर शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र. ८२४/२०२४/व्यय-१५, दि.१८/१२/२०२४ रोजीच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(संतोष जया विठ्ठल रोकडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
२. महालेखापाल, महाराष्ट्र - २, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
३. महालेखापाल, (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), मुंबई.
४. संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई
६. नियोजन विभाग (कार्यासन-१४११/१४४४), मंत्रालय, मुंबई.
७. वित्त विभाग (का.व्यय-१५/ अर्थसंकल्प) मंत्रालय, मुंबई.
८. अवर सचिव (अर्थसंकल्प शाखा), पर्यटन व सांस्कृतिक विभाग, मंत्रालय, मुंबई (यांना आदेशात नमूद करण्यात आलेल्या संबंधित नियंत्रक अधिकारी, पर्यटन संचालनालय यांच्याकडे निधी वितरीत करण्याच्या विनंतीसह)
९. निवड नस्ती, कार्यासन-पर्यटन-१.

******